बिना अनुदान तत्वावर सन २०००-२००१ पासून नवीन तंत्रनिकेतन /नवीन पदविका अभ्यासक्रम / प्रवेशक्षमतावाढ सुरु करण्यास मंजूरी ...........

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक- पीटीआय-२०९९/ (१९२/९९)/तांशि-२

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२

दिनांक : २६/६/२०००

**शासन निर्णय**

सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मधील सर्व संस्थांस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शासनाने विहित केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून सन २०००-२००१ करिता मान्यता देण्यासाठी उद्देशपत्र देण्यात आले होते. त्याप्रमाणे सन २०००-२००१ पासून सदर संस्थांच्या समोर दर्शिविलेले अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सदर मंजुरी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.**

१) संस्थेकडे तंत्रनिकेतनासाठी स्वतंत्र इमारत असावी.

२) संस्थेने एक वर्षात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सर्व सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे

३)शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहितकेलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच वरील अनुक्रमांक १ व २ बाबत संस्थेस करारनामा करावा लागेल व संबंधित कागदपत्रांनी आणि औपचारिक बाबींना पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमत्तीने समाधानकारकरित्या करण्यात येईल. उपरोक्त औपचारिक बाबी, सदर संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्याशी संपर्क साधून पूर्ण करणे आवश्यक आहे

४) सदर तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमास तंत्रशिक्षण परीक्षा मंडल, महाराष्ट्र राज्य यांनी संलग्नता घ्यावी लागेल.

६) विना अनुदान तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमांच्या बाबतीत वेळोवेळी राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या / येणाऱ्या नियमांच्या प्रवेश नियमांच्या, आरक्षणाची . शिक्षण शुल्क व इतर शुल्क यासंबंधीच्या निर्णयांचे पालन करणे सदर संस्थेला बंधनकारक असेल.

२. उपरोक्त औपचारिक बाबी, सदर संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी संपर्क साधून पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाकडून संलग्नीकरणास परवानगी घेतल्यानंतर तंत्रशिक्षण संचालकांच्या अंतिम मान्यतेनंतर सदर संस्थेने नियमानुसार प्रवेशाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

४. सदर संस्थेत दिलेली मान्यता लक्षात घेऊन संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन सदर संस्थेचा व त्यामधील अभ्यासक्रमांचा तपशील लक्षात घेऊन संस्थांची अद्यावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि.कि.कुंबाले

( वि. कि. कुंबाले )

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१)संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२)सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,

३)सचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडल,महाराष्ट्र राज्य,शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१,

४)संबधित संस्था

५)सदस्य सचिव अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, आय पी इस्टेट, नवी दिल्ली-२,

६)सहाय्यकशिक्षण सल्लागार ( तांत्रिक ) भारत शासन मनुष्यबल विकास मंत्रालय,(शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय

(शा.नि.क्र:- पीटीआर-२०९९/(१९२/९९) तांशि.२
दि.२६-६-२००० सोबतचे प्रपत्र)

**प्रपत्र - अ**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | श्री. त्रिलोक जैन मंडळाचे, श्री.आनंद कॉलेज ऑफ फार्मसी,अहमदनगर. | डी. फार्मसी | ४० चे ६० |
| | इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी मारेगाव, जि. यवतमाळ. | डी. फार्मसी | ४० चे ६० |
| | डॉ. डी.वाय. पाटील, महिलांचे तंत्र निकेतन, नवी मुंबई. | इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी<br>कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६०<br>६० |
| | दत्ता मेघे तंत्र निकेतन, नागपूर. | कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी<br>इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन | ३० चे ६०<br>३० चे ६० |
| | भवभूती शिक्षण संस्थेचे, इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, आमगाव, भंडारा. | डी. फार्मसी | ३० चे ६० |
| | श्री. शिवाजी विद्या प्रसारक तंत्र निकेतन, पो. बॉक्स क्र. ११३, धुळे. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |

(वि.वि.कुंभार)